महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
नवीन मंत्रालय, ९वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
दुरध्वनी क्र.२२७१९४७१ E-mail: medd.adhiniyam@gov.in

क्रमांक- **MEDD-14012(1)/1/2025-MMD(Adhi)** दिनांक: २८ जानेवारी, २०२५.

प्रति,
प्रधान सचिव,
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**विषय** :- Maharashtra State Allied and Healthcare Council चे सचिवपद प्रतिनियुक्तीने भरण्याच्या अनुषंगाने शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देणेबाबत..

**संदर्भ** :- १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन-१२, दि.१७.१२.२०१६
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/ कार्यासन-१२, दि.१६.०२.२०१८

महोदय,

केंद्र शासनाच्या The National Commission for Allied and Healthcare Professions Act, २०२१ मधील कलम २२ नुसार Maharashtra State Allied and Healthcare Council चे गठण दि.१०.१०.२०२४ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये करण्यात आलेले आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ६८ नुसार Maharashtra State Allied and Healthcare Council Rules, २०२४ दि.१०.१०.२०२४ रोजीच्या अधिसूचनेन्वये अधिसूचित करण्यात आलेले आहेत. Maharashtra State Allied and Healthcare Council च्या कार्यालयाकरिता सचिवपद भरण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली असून त्याकरिता मंत्रालयीन संवर्गातील अवर सचिव पदावरील अधिकाऱ्याची नियुक्ती प्रतिनियुक्तीने करावयाची आहे. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या जाहिरातीस शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी, ही विनंती.

आपला,

सहपत्रे- वरीलप्रमाणे.

(डॉ. तुषार पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- अधिनियम, निवडनस्ती.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

नवीन मंत्रालय, ९वा मजला,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.

दुरध्वनी क्र.२२७१९४७१ E-mail: medd.adhiniyam@gov.in

क्रमांक- **MEDD-14012(1)/1/2025-MMD(Adhi)**, दिनांक: २८ जानेवारी, २०२५.

प्रति,

सह/उपसचिव (आस्थापना)

सर्व मंत्रालयीन विभाग,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**विषय** :- Maharashtra State Allied and Healthcare Council चे सचिवपद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत...

**संदर्भ** :- १) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन-१२, दि.१७.१२.२०१६

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/ कार्यासन-१२, दि.१६.०२.२०१८

महोदय/महोदया,

राज्य शासनाच्या विविध विभागात/ विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे/ महामंडळातील पदावर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे नवीन धोरण सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त संदर्भाधीन दि.१७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेले आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार Maharashtra State Allied and Healthcare Council च्या कार्यालयातील पुढील तक्त्यात नमूद पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहेत :-

| अ.क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाचे नाव |
|---|---|---|---|---|
| Maharashtra State Allied and Healthcare Council च्या कार्यालयातील पद | | | | |
| १ | सचिव | कामा व अल्बेस रूग्णालय, मुंबई | एस २३ : ६७७००-२०८७०० | मंत्रालयीन विभागातील अवर सचिव संवर्गातील अधिकारी |

२. तरी सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील संबंधित अधिका-यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षांच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ. माहिती संदर्भाधीन शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे, याबाबतची माहिती सोबतच्या विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये उपसचिव (अधिनियम), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नवीन मंत्रालय, ९वा मजला,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१, यांचेकडे दि.२१.०२.२०२५ रोजी पर्यंत निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत. इच्छूक अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे, याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छूक नसल्यास, निरंक असेही कृपया कळविण्यात यावे. एकदा निवड झालेल्या अधिका-याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या https://intranet.maharashtra.gov.in/ या वेबसाईटवरील संदेशफलक या टॅबखाली प्रसिद्ध करण्यात आली आहे.

आपला,

सहपत्रे- वरीलप्रमाणे.

(डॉ. तुषार पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- अधिनियम, निवडनस्ती.

**Maharashtra State Allied and Healthcare Council** च्या कार्यालयातील सचिव हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात इच्छूकता मागविण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकाऱ्याचे संपूर्ण नांव | |
| २. | पदनाम / संवर्ग पदाची वेतनश्रेणी | |
| ३. | सध्याच्या कार्यालयाचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४. | जन्म दिनांक | |
| ५. | शैक्षणिक अर्हता | |
| ६. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७. | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ८. | संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे ? तसेच, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार/लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे, | |
| ९. | संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे- | |
| १०. | संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे, | |
| ११. | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.०२.२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे, | |

*************